# करआकारणी व करसंकलन विभाग
# पुणे महानगरपालिका

प्रश्न १ मिळकतकराची आकारणी कोणत्या मिळकतींवर केली जाते ?

उत्तर महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व इमारती व मोकळ्या जमिनींवर मिळकतकराची आकारणी केली जाते.

प्रश्न २ इमारतीची कर आकारणी करताना कार्पेट/ बिल्टअप क्षेत्रफळापैकी कोणते क्षेत्रफळ विचारात घेतले जाते?

उत्तर इमारतीची कर आकारणी करताना मिळकतीचे कार्पेट क्षेत्रफळ विचारात घेतले जाते.

प्रश्न ३ मिळकतींवर कर आकारणी कशाप्रकारे केली जाते ?

उत्तर मिळकतींवर खालील बाबी विचारात घेऊन आकारणी केली जाते

१. मिळकतीचे चटईक्षेत्र (कार्पेट) क्षेत्रफळ

२. मिळकतीचे प्रकार निवासी/बिगरनिवासी /मोकळ्या जागा /मिश्र

३. मिळकत ज्या विभागात आहे त्या विभागातील वार्षिक करयोग्य मुल्याचा प्रति चौरस फूट दर.(पुणे मनपाचे स्वतंत्र रेडी रेकनर आहे )

४. बांधकामाचा प्रकार आर.सी.सी बांधकाम / लोड बेअरींग/पत्रा शेड

प्रश्न ४ मिळकतकराचे बिल कुठे मिळेल ?

उत्तर १.सर्व मिळकतधारकांना मिळकतकराच्या बिलाचे वाटप केंद्र सरकारच्या पोस्ट विभागा मार्फत केले जाते.

२. मिळकत ज्या विभागीय करसंकलन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येते त्या विभागीय कार्यालयात किंवा महापालिकेच्या propertytax.punecorporation.org या संकेतस्थळावरही मिळकतीचे बिल मिळकत संगणक क्रंमांक टाकून मिळते.

प्रश्न ५ मिळकतकर भरण्याची अंतिम मुदत काय असते ?

उत्तर पहिली सहामाही ( दिनांक १ एप्रिल ते ३० सप्टेंबर) या कालावधीची संपुर्ण मिळकतकराची रक्कम भरण्यास दिनांक ३० जून अखेर अशी मुदत असून, दुसरी सहामाही ( दिनांक १ आक्टोंबर ३१ मार्च) या कालावधीची संपुर्ण मिळकतकराची रक्कम् भरण्यास दिनांक ३१ डिसेंबर अखेर अशी मुदत देण्यात आली आहे.

प्रश्न ६ मिळकत कर वेळेत भरला नाही तर किती दंड अथवा विलंबशुल्क भरावे लागते ?

उत्तर १. पहिल्या सहामाहीची रक्कम ३० जून अखेर न भरल्यास दिनांक १ जूलै पासून प्रति महा २ % व दुस-या सहामाहीची रक्कम ३१ डिसेंबर अखेर न भरल्यास दिनांक १ जानेवारीपासुन प्रति महा २% दराने मनपा दंडाची आकारणी करते.

२. थकबाकी रक्कमेवर प्रति महा २ % दराने शास्तीची आकारणी केली जाते.

३. विहित मुदतीत मिळकतकराची रक्कम भरणा न केल्यास शिक्षणकर,रोजगार हमी कर या शासनकरावर वार्षिक १०% दराने शिक्षणकर नोटीस फी व रोजगार हमी कर नोटीस फी ची आकारणी केली जाते.

प्रश्न ७ मिळकतकरामध्ये सवलत मिळावी यासाठीच्या काही योजना आहेत काय ? असल्यास कोणत्या?

उत्तर १.संपुर्ण मिळकतकराचा भरणा थकबाकीसह ३१ मे पर्यंत केल्यास चालू वर्षाच्या संपुर्ण सामान्य करात खालीलप्रमाणे सवलत दिली जाते.

मिळकतकरा अंतर्गत येणारी एकूण मागणी विचारात घेवून त्यामधील सर्वसाधारण कराच्या चालू मागणीची रक्कम रू.२५००० पेक्षा कमी आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत १० टक्के सूट व ज्यांची

सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू.२५००१ पेक्षा अधिक आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत ५ टक्के सवलत दिली जाते.

२.स्वातंत्र्य सैनिकः

माजी सैनिकांच्या विधवा पत्नीच्या/विदूर माता यांच्या नावे असलेल्या मिळकतींना तसेच उत्कृष्ठ कामगिरीकरिता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांच्या मिळकतींना मिळकत करातून(शासकीय कर वगळता) सवलत देण्यात येते.

स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत यांच्या एका निवासी मिळकतीस सामान्यकरात १००% सवलत.

३. ज्या निवासी मिळकतीमध्ये सौरउर्जा,गांडूळखत प्रकल्प,रेनवॉटर हार्वेस्टिंग केले असेलः

१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकल करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी दोन बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाèया चालू करांच्या एकूण रकमेच्या १०% सूट( पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त)

२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकल करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी एका बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या एकूण रकमेच्या ५ % सूट( पाणीपटटी व शासनाचे कराव्यतिरिक्त)

प्रश्न ८ पुणे मनपा झोपडपटटी पूनर्वसन योजनेअंतर्गत मिळकतकरात काही सवलती आहेत का?

उत्तर पुणे मनपा झोपडपटटी सुधारणेच्या योजनेअंतर्गत निवासी वापरासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीवर मिळकतकराची करआकारणी खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात मा.मुख्यसभा ठराव क्रं.११५९ दिनांक २६.३.२००३ पासून मान्यता मिळाली आहे.

| **क्र.** | **कालावधी** | **मिळकतकर कमी केलेले दर** |
|---|---|---|
| १ | पहिल्या वर्षापासून दहाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता |
| २ | अकराव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता |
| ३ | पंधराव्या वर्षापासून विसाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता |
| ४ | विसाव्या वर्षापासून पुढे कराच्या १०० टक्के | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता |

.

वरील मिळकतकरामध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणकराचा समावेश नाही. तसेच बिबवेवाडी पूनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलल्या प्रती ओटा रूपये ३०० या प्रमाणे पाणीपटटी आकारली जात असल्याने त्याच दराने पाणीपटटी आकारण्यात येईल.

प्रश्न ९ मिळकतीच्या कर आकारणी प्रकरणी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत ?

उत्तर १. जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे (खरदीखत/इंडेक्स खख / ७-१२ उतारा/सिटीसर्व्हे उतारा प्रॉपर्टी कार्ड)

२. बांधकाम परवाना विभागाकडील खालील कागदपत्रे :

· बांधकाम परवाना दाखला· बांधकाम पुर्णत्वाचा दाखला·बांधकाम मंजुरीचा नकाशा

मिळकतीची कर आकारणी करताना कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही. तथापि मिळकतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मिळकतधारकाने १५ दिवसात महापालिकेस कळविणे बंधनकारक आहे.

प्रश्न १० यूएलसी अंतर्गत सदनिकाचें वाटप केल्यास मिळकतकराबाबत काय धोरण आहे. ?

उत्तर महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. युएलसी/२२/ २००६/ ६८२ नाजकधा दि १७/०६/०६. अन्वये शासन निर्णय नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम १९७६ च्या कलम २० व २१ खालील गृहबांधणी योजनेतुन शासन देय सदनिकेचा ताबा विकासकामे शासनाच्या ताब्यात दिल्यापासुन या सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेईपर्यंतच्या (करारनामा नोंदणीकृत होईपर्यंत) कालावधीसाठी या सदनिकेबाबत संबंधित महानगरपालिकेने मालमत्ता कर व अन्य कर आकारणी करु नये. सदर सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेतल्यापासुन या सदनिकेसाठी मनपाने मालमत्ता कराची आकारणी करावे असे शासन निर्णय आहे.

प्रश्न ११ मिळकतीवर कर आकारणीची कार्यवाही किती दिवसात पुर्ण केली जाते ?

उत्तर कर आकारणीबाबत हरकत न आल्यास २१ दिवसांत व हरकत आल्यास ६० दिवसात सुनावणी घेवून मिळकतीवर कर आकारणीची कार्यवाही पुर्ण केली जाते.

प्रश्न १२ मिळकतकराचे बिल अथवा मिळकतकराची आकारणी याबाबत तक्रार असल्यास कुठे संपर्क साधावा ?

उत्तर पुणे मनपा मुख्य इमारत व मिळकत ज्या क्षेत्रिय / संपर्क कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येते त्या कार्यालयामध्ये तक्रारीच्या निराकरणासंदर्भात संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन तक्रार्र propertytax.punecorporation.org या वेबसाईटवर करता येईल.

प्रश्न १३ वाढीव बांधकामाची कर आकारणी करताना आकारणी झालेल्या पुर्वीच्या जुन्या दरानेच केली जाते का?

उत्तर नाही. वाढीव बांधकाम ज्या वर्षात पूर्ण झालेले असेल त्या सरकारी वर्षाच्या प्रचलित दरानेच केली जाते.

प्रश्न १४ निवासी मिळकतीच्या वापरात बदल करुन बिगर निवासी वापर सुरु केल्यास कर आकारणी कशी केली जाते ?

उत्तर मिळकतीच्या वापरातील बदलास परवानगी असल्यास बिगर निवासी वापराच्या प्रचलित दराने कर आकारणी केली जाते.

प्रश्न १५ मिळकतीच्या हस्तांतरणाकरीता आवश्यक कागदपत्रे कोणती ?

उत्तर मिळकतीच्या हस्तांतरणाकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत

१. मालकी हक्काची कागदपत्रे (सातबारा/प्रॉपर्टी कार्ड /खरेदीखत /इंडेक्स खख)

२. सोसायटी असल्यास सोसायटीचा ना हरकत दाखला

३. चालू आर्थिक वर्षाअखेर संपूर्ण कर भरलेली पावती. (ना देय प्रमाणपत्र)

४. ओनर ऑक्युपायर नावातील बदलासह अन्य मिळकत हस्तांतरण फी करयोग्य मूल्य १ ते ५०० पर्यंत रू.१००० व त्यापुढील प्रत्येक शेकडयास अगर त्याच्या भागास रू.३०

५. पूरग्रस्त वसाहतीमधील नावात बदल करणेसाठी मा. जिल्हा अधिकारी कडील ‘फिल्ड रजीस्टरङ् चा उतारा. असा उतारा नसल्यास मा. स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार मुळ मालकाचे नाव कायम ठेवून वसुल देणार म्हणून नवीन नावाचे नोंद घेतली जाते.

प्रश्न १६ मिळकतीचे वारस हक्काने हस्तांतरण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती ?

उत्तर वारसा हक्काने हस्तांतरण करण्याकरिता खालील कागदपत्रे आवश्यक आहेतः

१ मिळकतधारकाचा मृत्यू दाखला

२. वारसाहक्काबाबत प्रतिज्ञापत्र/ कोर्ट प्रमाणपत्र,हेअरशिप/सक्सेशन सर्टिफिकेट
वारसाहक्काबाबत असल्यास त्याची सत्यप्रत/इच्छापत्राची सत्यप्रत

३. सोसायटी असल्यास सोसायटीचा ना हरकत दाखला/भाग हस्तांतरण केल्याच्या दाखल्याची प्रत.

४. चालू आर्थिक वर्षाअखेर संपूर्ण कर भरलेली पावती(ना देय प्रमाणपत्र)

५. निवासी मिळकतीस हस्तांतरण फी करयोग्य मूल्य १ ते ५०० पर्यंत रू.२० व पुढील प्रत्येक शंभारास रू.१५

६. बिगर निवासी मिळकत व मोकळी जागा वारस हक्काने बदलासाठी हस्तांतरण फी करयोग्य मूल्य १ ते ५०० पर्यंत रू.५०० व पुढील प्रत्येक शंभारास रू.३०.

७. खरेदी खत न करता केवळ कंपनीच्या नावातील दुरूस्ती / बदलाबाबत वरील अ.क्र ७ मध्ये दर्शविण्यात आलेली फी स्विकारण्यात येते.

प्रश्न १७ मिळकतीच्या हस्तांतरणाची कार्यवाही किती दिवसात पूर्ण केली जाते ?

उत्तर मिळकत हस्तांतरण करण्याबाबत हरकत नसल्यास १५ दिवसांत व हरकत असल्यास , त्याबाबत पुर्तता झाल्यानंतर/ कागदपत्र उपलब्ध करून दिल्यानंतर १० दिवसात मिळकत हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण केली जाते.

प्रश्न १८ मिळकतकर हस्तांतरण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करता येते का?

उत्तर होय, हि सुविधा पुणे महानगरपालिकेच्या http://rts.punecorporation.org या वेबसाईट वरून करता येते, सदर वेबसाईट वर जाऊन सर्व कागदपत्रे अपलोड करून मिळकतकर हस्तांतरणाचे शुल्क ऑनलाईन भरून झाल्यावर अपलोड केलेल्या कागदपत्रांची योग्यरित्या तपासणी करून सदर नागरिकास Email द्वारे TAT CERTIFICATE पाठविले जाते.

प्रश्न १९ मिळकतकराचा भरणा कोणत्या स्वरूपात व कुठे स्वीकारला जातो ?

उत्तर १. मिळकतकराची रक्कम रोख/चेक/डी डी ऑनलाईन स्वरूपात स्वीकारली जाते.

२.करसंकलन विभागाच्या १५ विभागीय व ७ संपर्क कार्यालयांत किंवा महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये रक्कम रोख/चेकने या मिळकतकराची रक्कम स्वीकारली जाते.

३. महानगरपालिकेने विविध क्षेत्रीय/ संपर्क कार्यालयात तसेच विविध ठिकाणी ठेवण्यात आलेल्या क्रेडीट/डेबिट कार्ड द्वारे देखील रक्कम स्विकारली जाते.

४. एचडीएफसी, कॉसमॉस, आयसीआयसीआय, बँक ऑफ महाराष्ट्र, इंडसइंड बँक, जनता सह. बँक या बँकेच्या शाखेमध्ये मिळकत कर स्विकारला जातो.

५. तसेच ऑनलाईन पेमेंटसाठी propertytax.punecorporation.org महापालिकेच्या या संकेतस्थळावर मिळकतकराची रक्कम ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

| अ.क्र | क्षेत्रीय/संपर्क कार्यलय | फोन नं. |
|---|---|---|
| १ | औंध क्षेत्रीय कार्यालय | २५८९७९८२ |
| २ | घोले रोड क्षेत्रीय कार्यालय | २५५०१५५० |
| ३ | कोथरूड क्षेत्रीय कार्यालय | २५४३२६२० |
| ४ | वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय | २५४३२१९२ |
| ५ | कै. ब.स.ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालय | २६१६१४७० |
| ६ | नगर रोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय | २५५०९०१० |
| ७ | संगमवाडी/येरवडा क्षेत्रीय कार्यालय | २५५०९११० |
| ८ | भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय | २६४३७०४० |
| ९ | सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय | २४२२१७१९ |
| १० | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय | २५५०७६०९ |
| ११ | टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय | २५५०८०२० |
| १२ | हडपसर क्षेत्रीय कार्यालय | २६८२१०९२ |
| १३ | बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय | २५५०८०२० |
| १४ | धनकवडी क्षेत्रीय कार्यालय | २५५०६९७२ |

| | | |
|---|---|---|
| १५ | वडगाव बु. संपर्क कार्यालय | २४३५७५२७ |
| १६ | बाणेर संपर्क कार्यालय | २७२९२२१२ |
| १७ | वडगाव धायरी संपर्क कार्यालय | २४३९४६६५ |
| १८ | कात्रज संपर्क कार्यालय | २५५०८९०७ |
| १९ | कोंढवा संपर्क कार्यालय | २६८३२०४२ |
| २० | वडगाव शेरी संपर्क कार्यालय | २७०३१०३३ |
| २१ | चंदननगर खराडी संपर्क कार्यालय | २५५०६९७५ |
| २२ | कळस धानोरी संपर्क कार्यालय | २५५०१४७६ |
| २३ | हिंगणे खुर्द संपर्क कार्यालय | २४३५२४३३ |
| २४ | कोंढवा वानवडी क्षेत्रीय कार्यालय | २५५०६२६४ |

प्रश्न २० धनादेश / पे ऑर्डर कोणाच्या नावे काढावेत. ?

उत्तर धनादेश / पे ऑर्डर 'कर आकारणी व कर संकलन प्रमुख पुणे मनपा' यांचे नावे काढावेत.

इंग्रजीमध्ये ( Assessor & Collector of Taxes PMC) यांचे नावे काढावेत.

प्रश्न २१ मिळकतकर ऑनलाईन भरण्याची सुविधा कशी वापरावी ?

उत्तर

१. महापालिकेच्या punecorporation.org, propertytax.punecorporation.org या संकेतस्थळावर मध्ये pay online या link वर click करा.

२. त्यानंतर property id नंबर (O /P / F ने सुरूवात होते) भरून submit वर click करा

३. आपल्या मिळकतीचा तपशील तपासून pay online वर click करा

---

प्रश्न २२ मिळकतीचा उतारा कुठे मिळेल ?

उत्तर

१. कर आकारणी चा (Assessment) उतारा पुणे मनपा भवन आकारणी विभाग रूम नं. ६ येथे मिळेल.

२. आठ 'अ' व आठ 'ड' चा उतारा मिळकत ज्या विभागीय/ संपर्क कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येते. त्या विभागीय/ संपर्क कार्यालयामध्ये मिळेल.

३. एका वर्षासाठी रूपये ३०/- फी भरणा केल्यानंतर मिळकत उतारा मिळेल.

प्रश्न २३ मिळकतधारकाची थकबाकी नसल्याचा दाखला कुठे मिळेल ?

उत्तर

१. मिळकत ज्या विभागीय /क्षेत्रीय कार्यालये तसेच संपर्क कार्यालये व मनपा मुख्य भवन येथील करसंकलन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येते, त्या कार्यालयामध्ये रूपये २५/- दाखला फी व मिळकतकराची संपूर्ण रक्कम भरल्यानंतर थकबाकी नसल्याचा दाखला मिळेल.

२.ऑनलाईन एनओसी/ ना हरकत propertytax.punecoporation.org या संकेतस्थळावर जावून GET NOC वर click करा.

३. नंतर मोबाईल नंबर व ईमेल आयडी भरा. OTP क्रमांक आपल्या मोबाईल नंबर वर आल्या नंतर तो टाकून submit करा.

४. मिळकतीचा संगणक क्रमांक भरू न submit करा. व save बटन वर click करून online NOC साठी apply होईल व काही क्षणात आपल्या ईमेल आइडी वर सदर मिळकतीची NOC उपलब्ध होईल.

---

प्रश्न २४ मिळकतकराबाबत सदयस्थितीची त्वरीत माहिती कशी उपलब्ध होईल?

उत्तर १. propertytax.punecorporation.org या संकेतस्थळावर भेट द्यावी अथवा 02025501164 वर संपर्क साधावा.

२. पुणे महानगरपालिकेने मिळकतदारांचे मोबाईल नंबर व ईमेल आयडी त्यांचे मिळकतकराचे डेटाबेसमध्ये ॲड करणेची मोहिम सुरू केली आहे. मिळकतदारांनी त्यांचा मोबाईल नंबर व ई मेल आयडी ची नोंद नागरी सुविधा केद्रामध्ये करून घ्यावी म्हणजे एसएमएस व ई मेलच्या माध्यमातून सस्थितीची माहिती उपलब्ध होईल.

प्रश्न २५ कोणत्या मिळकतीस करपात्र रक्कमेमध्ये ४० टक्के सवलत दिली जाते ?

उत्तर ज्या निवासी मिळकतीचा वापर मालक स्वतःच्या राहण्यासाठी करत असेल अशा एका मिळकतीस करपात्र रक्कमेत ४० टक्के सवलत दिली जाते.

प्रश्न २६ एखादया मिळकतीस करपात्र रक्कमेत ४० टक्के सवलत दिली नसल्यास ती मिळणेबाबत कोणती कार्यपध्दती करणे आवश्यक आहे?

उत्तर निवासी मिळकतीमधील निवासी भाडेकरी जागा खाली केल्यास, पूर्वी सदनिकेवर विकसन कत्र्याचे नाव कमी करुन मालकाने स्वतःच्या नावाने नोंद करुन घेतले असल्यास त्याप्रमाणे कागदपत्रे व जागेचा वापर स्वतः राहण्यासाठी करत असल्याबाबत पासपोर्ट, लायसन्स,बँक पासबुक,आधारकार्ड,बीएसएनलचे टेलीफोन बील, सोसायटीचे पत्र, गॅस कार्ड इ. कागदपत्रे सादर करुन अर्ज करणे आवश्यक आहे. (पीटी ३ फॉर्म भरावा)

प्रश्न २७ कोणत्या मिळकतीस दुपटी इतकी शास्तीची आकारणी होते ?

उत्तर १. कलम २६७ अ नुसार अनधिकृत बांधकाम केलेल्या बांधकामांस एकपट कर व दुपटटी इतकी शास्ती आकारण्यात येते.

२. ज्या मिळकतीस बांधकाम परवानगी घेण्यात आलेली नाही अशा अनधिकृ त बांधकामास एकपट कर व दुपटटी इतकी शास्ती आकारण्यात येते.

३. जुन्या बांधकामावर वाढीव बांधकाम विना परवाना केले असल्यास अशा वाढीव बांधकामास एकपट कर व दुपटटी इतकी शास्ती आकारण्यात येते.

प्रश्न २८ ३ पट शास्ती ची आकारणी एकपट दराने कशी कमी करता येईल ?

उत्तर पूर्वी ज्या मिळकतीस बांधकाम परवानगी मिळाली आहे परंतू बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला नाही अशा मिळकतदाराने बांधकाम चालू करण्याच्या परवानगी प्रमाणे मान्य नकाशाप्रमाणेच बांधकाम केले असल्याबाबत बांधकाम विभागाकडून पत्र आणल्यास त्याची कर आकारणी एकपट दराने करता येईल.

प्रश्न २९ पुणे शहरातील मोबाईल टॉवरची कर आकारणी कशी केली जाते ?

उत्तर प्रत्यक्ष मिळणारे वार्षिक भाडे विचारात घेवून त्यामध्ये देखभाल दुरुस्तीसाठी १५ टक्के सवलत वजा जाता उर्वरीत रक्कम संबंधित मोबाईल टॉवरची करपात्र रक्कम. करारनामा दिनांकपासून दोन महिने टॉवर इन्स्टॉलेशनसाठी विचारात घेवून तीसटेया महिन्याची पहिली तारीख ही अमलबजावणी दिनांक असेल.

प्रश्न ३० मिळकतकराबाबत न्यायालयात अपिल कसे करावे?

उत्तर बिलाच्या बाबतीत अपील करणे झाल्यास मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९चे कलम ४०६ मधील तरतूदीस पात्र राहून व बिल पोहोचल्यापासून १५ दिवसात न्यायालयात अपील करता येईल. अपिल करण्यापूर्वी मिळकतीवर असलेल्या कराची रक्कम भरणे बंधनकारक आहे

प्रश्न ३१ बिगर निवासी मिळकत बंद असल्यास जागा रिकामी राहिल्यास कर परतावा कसा करता येईल ?

उत्तर १.नियम ५६ अन्वये जागा रिकामी राहिल्यामुळे मालमत्ता कारची रक्कम परत देणेबाबत तरतूद आहे.
२.नियम ५७ अन्वये जागा रिकामी असल्याविषयी आयुक्तास नोटीस दिल्याशिवाय परताव्याची मागणी करता येणार नाही.
३.पहिल्या सहामाहीसाठी १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत व दुसऱ्या सहामाहिसाठी नोटीस १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत नोटीस देणे बंधनकारक आहे.
४. नोटीस देण्यापूर्वी सदर मिळकतीवर असलेली मिळकत कराची रक्कम भरणे आवश्यक आहे.
५. नोटीस नंतर प्रत्यक्ष जागा तपासणी होवून त्यानुसार निवेदन अंतर्गत अर्थान्विक्षक विभागाकडून संमती मिळाल्यानंतर खातेप्रमुख यांची मान्यता घेवून रिफंड कार्यवाही करण्यात येते.

पश्न ३२ महाराष्ट्र शासनाचा मोठा निवासी कर कोणत्या मिळकतीस लागतो ?

उत्तर ज्या निवासी मिळकतीचे चटई क्षेत्र १५० चौ मी. व त्यापेक्षा अधिक आहे अशा मिळकतीस मोठा निवासी कर आकारण्यात येतो. मोठया निवासी कराचा दर करपात्र रकमेच्या १० टक्के इतका आहे. सदर कर मनपा जमा करते व शासनास पाठविते.

प्रश्न ३३ निवासी मिळकतीमध्ये सौरउर्जा,गांडूळखत प्रकल्प,रेनवॉटर हार्वेस्टिंग केले असेल त्यांनी मिळकतकरात सवलत घेणेसाठी कोणती कार्यपध्दती करावी. ?

उत्तर पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतदारांनी विविध क्षेत्रिय कार्यालयाकडे सवलती साठी अर्ज करावे. क्षेत्रिय अधिकारी यांचे नियंत्रणाखालील गांडूळखंत प्रकल्पाबाबत आरोग्य विभाग, रेनवॉटर हार्वेस्टींग-बांधकाम विभाग, सोलर सिस्टीम-विदयूत विभागाने सदर योजना कार्यान्वीत असल्याबाबत तपासणी करून तसे प्रमाणपत्र मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने करआकारणी व करसंकलन विभागाकडे पाठविले जाते.

प्रस्तूत प्रमाणपत्र/अहवाल विचारात घेऊन येणाऱ्या आर्थिक वर्षापासून कर आकारणी व कर संकलन विभागाकडून मिळकतकरामध्ये सवलत देणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

प्रश्न ३४ मिळकतीची आकारणी एकपट दराने करता येऊ शकते का?

उत्तर होय, ६०० चौरस फूट निवासी क्षेत्र असलेल्या अनधिकृत घरांना तीनपट आकारणी न करता एकपटीने आकारणी करण्यात यावी यासाठी स्थायी समितीने ठ.क्र. ५६ दिनांक १८/०४/२०१७ रोजी तसेच मुख्यसभा ठ. क्र. ८० दिनांक २७/०६/२०१७ रोजी समती दिली आहे. या बाबत चे परिपत्रक propertytax.punecorporation.org येथे उपलब्ध आहे.

प्रश्न ३५ ऑनलाईन गेटवेमध्ये कोणत्या बँका, क्रेडीट व डेबिट कार्ड यांचा सामावेश आहे ?

उत्तर ऑनलाईन गेटवेमध्ये खालील बँकाचा सामावेश आहे.

| | |
|---|---|
| Andhra Bank | Jammu and Kashmir Bank |
| Axis Bank [Retail] | JanataSahakari Bank |
| Axis Bank [Corporate] | Karnataka Bank |
| Bank of Bahrain and Kuwait | KarurVysya Bank |
| Bank of Baroda [Corporate] | Kotak Bank |
| Bank of Baroda [Retail] | Lakshmi Vilas Bank [Corporate] |
| Bank of India | Lakshmi Vilas Bank [Retail] |
| Bank of Maharashtra | NKGSB Bank |
| BhartiyaMahila Bank | Oriental Bank of Commerce |
| Canara Bank | Punjab and Sind Bank |

| | |
|---|---|
| Catholic Syrian Bank | Punjab National Bank [Corporate] |
| Central Bank of India | Punjab National Bank [Retail] |
| City Union Bank | RBL Bank [Corporate] |
| Corporation Bank | RBL Bank |
| Cosmos Bank | RBS (The Royal Bank of Scotland) |
| DCB BANK | Saraswat Bank |
| Business DCB BANK | ShamraoVithal Co-op. Bank [Retail] |
| Personal Dena Bank | South Indian Bank Ltd |
| Dena Bank | Standard Chartered Bank [Retail] |
| Deutsche Bank | State Bank of Bikaner and Jaipur |
| Dhanlaxmi Bank [Corporate] | State Bank of Hyderabad |
| Dhanlaxmi Bank [Retail] | State Bank of India |
| Federal Bank | State Bank of Mysore |
| Federal Bank ScanNPay | State Bank of Patiala |
| HDFC Bank [Retail] | State Bank of Travancore |
| ICICI Bank | Syndicate Bank |
| IDBI Bank [Corporate] | Tamilnad Mercantile Bank |
| IDBI Bank [Retail] | TJSB Bank |
| Indian Bank | TNSC Bank |
| Indian Overseas Bank | UCO Bank |
| Induslnd Bank | Union Bank of India |
| ING Vysya Bank [Corporate](Now Kotak Bank) | United Bank of India |
| ING Vysya Bank [Retail](Now Kotak Bank) | Vijaya Bank |
| | YES Bank |

(Online PAYMENT Options)

| Sr. No | Payment Channel | Services |
|---|---|---|
| 1 | **EMI** | Citizen can pay property tax in the form of EMI (Tenure of 3 Month, 6 Months, 9 Months, and 12 Months) Using Credit Card only. |
| 2 | **Instapay** | Simple Payment Option to pay without Registration & hassle-free |
| 3 | **View & Pay** | Net Banking user can register and see their bill in account. |
| 4 | **Wallets** | mRUPEE,ICASH Card,ITZ CASH Card,Paycash Oxigen Wallet,Vodafone M-Paisa,Zip Cash Pockets (Powered by ICICI Bank |
| 5 | **IMPS** (Immediate Payment Service) | Can pay through Mobile Number & account no associated |
| 6 | **Credit Card** | Visa, American Express MasterCard, Diners |

| | | |
|---|---|---|
| 7 | **Debit Card** | Visa, Maestro<br>MasterCard, RuPay |
| 8 | **EMI** | Pay Property Tax in EMI by Your Credit Card |
| 9 | **UPI / Bharat QR** | By Using BHIM App can pay Property Tax |
| 10 | **NEFT-RTGS (Online EFT)** | New Facility to make Property Tax Payment by NEFT/RTGS through all banks. |
| 11 | **CCSI** | Credit Card Standing Instruction to Auto Debit whenever Property Tax Bill Generates. |
| 12 | **Direct Network [ATM-cum-Debit Card ]** | **15 Banks** |
| 13 | **Cash Card** | I cash Card,Pay cash<br>ITZ Cash Card,Zip cash |
| | **Internet Banking** | **67 Banks** |